# नवनीत



मे २००८

# मुखपृष्ठ

मुखपृष्ठावरील 'पाड्या'चे चित्र मनेश लहांगेने काढले आहे. मनेश लहांगे आणि संजय रावते हे दोन विद्यार्थी ऐन्याच्या 'ग्राममंगल निवासी मुक्त शाळा' या शाळेत शिकत होते. इयत्ता ७ वी पास झाल्यावर पुढील शिक्षणासाठी जून २००७ ला ते दोघे फलटणला कमला निंबकर बालभवनमध्ये आले. ग्राममंगल ही जुनी सुप्रसिध्द संस्था ठाणे जिल्ह्यातील ऐना येथे आदिवासी मुलांसाठी निवासी शाळा चालविते. ऐन्याच्या जवळपास हायस्कूल नाही. सातवीनंतर मुले घरी राहिली की पोट भरण्यासाठी वीटभट्टीवर किंवा शेतात जाऊ लागतात. १३-१४ व्या वर्षी त्यांची लग्ने करून दिली जातात आणि शिक्षणाला रामराम ठोकला जातो.

त्यातील काही मुले व त्यांच्या कुटुंबांनी पुढे शिकण्याची इच्छा दर्शविली. परंतु ऐन्याची शाळा फक्त सातवीपर्यंत होती. मुलांना पुढे शिक्षणासाठी कुठे पाठवायचे? ठाणे,पुणे, फलटण, या तीन पर्यायांपैकी फलटण जरी दूर असले तरी मुलांच्या ग्रामीण अनुभवविश्वाशी मिळतेजुळते होते आणि शहरापेक्षा कमी खर्चात मुलांची सोय होऊ शकत होती. कमला निंबकर बालभवनमध्ये वैयक्तिक लक्ष देऊन तयारी करून घेण्याची सोय होती. त्यामुळे ऐन्याची चार मुले- जमेश, नैनेश, मिलिंद आणि अतिश फलटणला २००४ साली दाखल झाली. सन २००६ मध्ये त्यांनी राष्ट्रीय मुक्त विद्यालयातून एस. एस. सी. पूर्ण केली. आज चौघेही किर्लोस्कर कंपनीत नोकरी करीत आहेत. नैनेश आणि जमेश हे दोघे राष्ट्रीय मुक्त विद्यालयातून १२ वी करीत आहेत.

२००७ मध्ये मनेश आणि संजय ही आणखी दोन मुले फलटणला आली आणि ती सध्या इयत्ता आठवीमध्ये शिकत आहेत. मनेश स्वतः कातकरी आदिवासी असून तो उत्तम तारपा नाचतो व वारली शैलीत चित्रे काढतो.

ग्राममंगल व प्रगत शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने चालणाऱ्या या प्रकल्पामुळे आदिवासी क्षेत्रातील मुले राष्ट्राच्या उभारणीमध्ये हातभार लावू शकत आहेत व फलटणसारख्या आदिवासी क्षेत्रापासून दूर असणाऱ्या मुलांना आदिवासी संस्कृतीची ओळख होत आहे.

प्रगत शिक्षण संस्था, फलटण
वार्षिक पत्रिका

# नवनीत

मे २००८

**संपादकीय मंडळ**
रेश्मा शिंदे
विराज तावरे
अक्षया पाटील
दीपिका जाधव

**रेखाचित्रे**
मुईन आतार
विराज तावरे
ओमप्रकाश धुमाळ
संदीप राठोड
विश्वजीत सांगळे

**संपादकीय सहाय्य**
डॉ. मंजिरी निमकर
डॉ. मॅक्सीन बर्नसन
स्वामिनी रुद्रभटे
प्रकाश अनभूले

**मुखपृष्ठ व मलपृष्ठ**
मनेष लहांगे

**रेखाटन मार्गदर्शक**
सुशांत अहिवळे

**प्रकाशन** : प्रगत शिक्षण संस्था, रिंगरोड, फलटण ४१५ ५२३
**संगणकीय अक्षरजुळणी** : सुषमा पंडित, प्रकाश अनभूले कमला निंबकर बालभवन
**मुद्रण** : श्री. प्रदिप पवार, कमिन्स डिझल इंडिया प्रिंटींग युनीट, प्रगत शिक्षण संस्था, फलटण
**फोन** : ०२१६६-२२३०४१
**email** : pssknb@dataone.in
**website :** www.pragatshikshan.com **or** www.indiaprogressiveeducation.com

# अनुक्रमणिका

प्रस्तावना/डॉ. मंजिरी निमकर/iii
बालसंसद/डॉ. मंजिरी निमकर/iv
माझे आजोबा/आदित्य पाटणकर, इ. ८ वी/१
आणि परीक्षा दिली/प्रथमेश इनामदार, इ. ५ वी/२
रेलगाडी, फिरकनी/मनाली साळूंखे, श्रध्दा कुलकर्णी, इ. ६ वी /४
चुना/प्रीतम पवार, इ. ६ वी/५
आम्ही बैल असा बनवला/शुभम, गौरी, समीक्षा, मयूर, इ. ३ री/६
पायलट s s s पायलट/ईशान रानडे, इ. ४ थी /८
पाऊस/सायली महांगडे, ज्योती मसूगडे, इ. १ ली/९
सहलीतील सातारा/अक्षता मगर, इ. ५ वी/१०
दळणवळण, विधाता /शेषा जोशी, मयुरी जाधव इ. ६ वी/ ११
देखो तुम्हारा बच्चा गिर रहा है/श्रध्दा कुलकर्णी, इ. ६ वी/१२
आई हरवली/शुभम कांबळे, इ. ४ थी/१४
नरसोबाची वाडी/विश्वजित भोकरे, इ. ६ वी/१६
झाडाचे मोल, प्राणी पक्षी/आरती गायकवाड, प्राजक्ता काकडे, इ. ५ वी/१७
गोम्या/श्रीरंग उंडे, इ. ६ वी/१८
स्वयंपाक, राणीचे आजारपण/वैष्णवी हेंद्रे, इ. ४ थी, अमीन मुल्ला, इ. ६ वी/१९
कमल्याचा तमाशा/रणजित गुंजवटे, इ. ९ वी/२०
शामरावांची झोप/स्नेहल कदम, इ. ६ वी/२१
घेण्याच्या नावाने शिमगा/संदीप राठोड, इ. ६ वी/२२
म्हाळुंग्याचा प्रसंग/ऋतुराज कदम, इ. ५ वी/२३
घोडा, मेरा स्कूल/स्वप्नील थोरात, इ. ६ वी, हर्षा भट्टड, इ. ५ वी /२४
आई. . . सॉरी/सौरभ शिंदे, इ. ८ वी/२५
म्हव/कमलेश गुंजवटे, इ. ४ थी/२७
मला, ते शब्द हवेत/पूजा गायकवाड, इ. ७ वी, आदित्य पाटणकर, इ. ८ वी/२८
पाडा/मनेष लहांगे, इ. ८ वी/२९
आमचा भैय्या/सुजित क्षीरसागर, इ. ६ वी/३१
गोड साखर/दीपिका जाधव, इ. ८ वी/३३
आम्ही हरलो आम्ही जिंकलो/अजिंक्य सोनवणे, सुमीत क्षीरसागर इ. ८ वी/३५
Our Cricket Match/Saurabh Shinde, standard 8/३७
A Magical Dream /Sameer Shaikh, standard 8/३८
A Thrilling Moment/Rushikesh Kumbhar, standard 8/३९
My sister, Spell of the night/Akshaya Patil, Reshma Shinde standard 8/४०

# प्रस्तावना

लेखन ही अतिशय गुंतागुंतीची प्रक्रिया असते. मुलांना आलेले अनुभव, त्यांबद्दल होणारा विचार , कल्पनाविलास आणि प्रत्यक्षात कागदावर ते सुडौल आकृतिबंधात मांडणे ही एक मोठीच कसरत असते. फार थोडेजण या आकृतिबंधाचा तोल साधू शकतात. जगभरामध्ये या प्रक्रियेवर बरेच संशोधन चालू आहे.

कमला निंबकर बालभवनमध्ये सृजनात्मक लेखनाला पहिल्यापासूनच महत्त्व दिले गेले आहे. दबावरहित मुक्त वातावरण, आपले अनुभव इतरांबरोबर वाटून घेण्याला दिलेले प्रोत्साहन, विविध कलांना व हाताने काम करण्याला दिले जाणारे महत्त्व, वर्गाच्या चार भिंतीबाहेरच्या जगाची शाळेच्या अभ्यासाशी केलेली गुंफण, बागकामासारखे सृजनशीलतेशी जोडलेले प्रकल्प आणि कसलेही चांगल्या-वाईटाचे निकष न लावता आपले अनुभव व लिखाण आहे तसे स्वीकारले जाईल याची खात्री यामुळे मुले आपली प्रतिभा पूर्णपणे विकसित करू शकतात.

'नवनीत'साठी मुलांचे आलेले लेखन त्यांनाच पुन्हा देऊन त्यांना काही बदलाच्या जागा सुचवल्या जातात. बदल करायचा की नाही हा निर्णय पूर्णतः मुलांचाच असतो. 'म्हव' किंवा 'कमल्याचा तमाशा'मधील वैशिष्ट्यपूर्ण ग्रामीण भाषा आम्ही मुद्दामच आहे तशी ठेवली आहे. पाडा या लेखातील मूळ वाक्यरचना राखली आहे. बहुसंख्य लेखांना चित्रेही लेखकांनीच काढली आहेत. त्यामुळे ती लेखकाच्या भावना वाचकापर्यंत सहज पोहोचवतात.

छोट्यांना वाटणारे चिखलाच्या किंवा चुन्याच्या मऊ स्पर्शाचे आकर्षण, पावसाळ्यात वीज गेल्यावर वाटणारी भीती, आयुष्यातील अपघात, मधाच्या पोळ्यातील मध गुपचुप काढून खाण्यातला थरार, मुलांच्या मजा, त्यांचे कल्पनारम्य जग, अंधश्रध्दा व परंपरा, समाजात दिसणारे वैचित्र्य व क्रौर्य आणि त्याचबरोबर त्यांना येणारे कडू-गोड अनुभव यांचे सुंदर चित्रण या अंकात पहायला मिळते.

**डॉ. मंजिरी निमकर**

# बालसंसद

बालसंसद ही तशी जुनीच कल्पना आहे. लोकशाही राष्ट्रात मुलांच्यात लहानपणापासून लोकशाही मूल्ये रुजविण्यासाठी विविध शाळा-संस्थांमध्ये मंत्रिमंडळ निवडले जाते. कमला निंबकर बालभवनमध्ये २००७-०८ या वर्षी निवडणुका घेऊन बालसंसदेची स्थापना झाली.

निवडणुकांची तयारी मतदार याद्या तयार करण्याने झाली. मतदार याद्या दर्शनी ठिकाणी लावल्या गेल्या. काही विद्यार्थ्यांची नावे नजरचुकीने राहून गेली होती, तर काहींच्या नावांत काही चुका झाल्या होत्या. विद्यार्थ्यांनी याद्या तपासून या सर्व त्रुटींची पूर्तता करून घेतली. याद्यांच्या बरोबरीने संसदेसाठी उभे राहण्याची इच्छा असलेल्यांना विहित नमुन्यात अर्ज पुरवले गेले आणि भरून घेतले गेले. जवळ-जवळ ७० अर्ज आले. सर्वाधिक अर्ज  इ. ४ थी व ५ वीमधील होते. तेव्हा लक्षात आले की लोकप्रतिनिधी होण्यातील गांभीर्य छोट्यांना समजलेले दिसत नाही म्हणून प्रार्थनेच्यावेळी पुन्हा एकदा लोकप्रतिनिधींच्या जबाबदाऱ्यांचे स्वरूप समजावून दिले. त्यानंतर ३० विद्यार्थ्यांनी अर्ज मागे घेतले.


यानंतरचा आठवडा प्रचाराचा होता. प्रचाराचे स्वरूप प्रार्थनेच्या वेळी भाषण करणे व वयक्तिक रीत्या अथवा वर्गावर्गात जाऊन विद्यार्थ्यांना मते देण्याविषयी आवाहन करणे असे होते.

मतदानाच्या दिवशी शाळेत निवडणुकीचे उत्साही वातावरण होते. मुलांच्या व मुलींच्या मतपत्रिका वेगवेगळ्या होत्या. चार मुलींच्या व चार मुलांच्या नावांसमोर शिक्के उठवायचे होते. अत्यंत शिस्तबध्द रीतीने ओळीने जाऊन यादीतील नाव पाहणे, त्यासमोर सही करून बोटाला शाई लावून घेणे, मतपत्रिका ताब्यात घेऊन 'बूथ' वर जाऊन हव्या त्या मुलांच्या नावासमोर शिक्के मारणे व घालून दिलेल्या घडीवर घडी घालून मतपत्रिका पेटीत टाकणे ही सर्व प्रक्रिया पार पडली. त्यानंतर मतमोजणी सुरू झाली. मोजणी शिक्षकच करीत होत, मात्र उमेदवारांचे निरीक्षक प्रत्येक टेबलाशी हजर होते. पहिली फेरी होताच मते लिहिली गेली. कोणी पुढे तर कोणी मागे. दुसऱ्या फेरीची मते आल्यावर चित्र बऱ्यापैकी स्पष्ट झाले आणि तिसरी फेरी झाल्यावर विजयी उमेदवारांचा जल्लोष झाला. चार मुलगे आणि चार मुली निवडून आल्या. त्यातील सर्वाधिक १२० मते मिळविणारी इयत्ता आठवीतील रेश्मा शिंदे मुख्यमंत्री म्हणून घोषित झाली. कमला निंबकर बालभवन राज्याची राज्यघटना तयार करण्याचे काम सध्या चालू आहे.

# माझे आजोबा


आदित्य पाटणकर

इयत्ता ८ वी

माझ्या आजोबांचे नाव रावसाहेब साहेबराव पाटणकर आहे. पण आम्ही त्यांना दादा म्हणतो. त्यांचे वय ८३ आहे, पण ते खूप काटक आहेत. त्यांना चष्मा नाही, हातात काठी नाही, तरी ते खूप लांबपर्यंत चालून येतात. आमच्या आजोबांना शेतीची खूप आवड आहे.यंदा त्यांचे जिल्ह्यामध्ये गव्हाचे पीक चांगले आले म्हणून इफको कंपनीने त्यांचा गौरव व सत्कार केला. ते या वयातही मजुरांच्या मागे उभे राहून शेतीची कामे करून घेतात. वेळ पडल्यास स्वतःही काम करतात. आम्ही खेडेगावात रहात असल्याने तेथे केव्हाही लाईट जाते व येते. अशा वेळेस ते काही वेळा रात्री ११ -१२ वाजता देखील मोटर चालू करण्यास शेतात जातात. त्यांना भीती हा प्रकार माहीत नाही. त्यांना शिक्षणाचे खूप महत्त्व वाटते. त्यांना माझ्या शाळेबद्दल (कमला निंबकर बालभवन) खूप अभिमान आहे. नातेवाईक आले की ते आमचे, आमच्या शाळेचे अभिमानाने गुणवर्णन करतात. माझी बहीण प्राजक्ता खूप हुशार आहे. तिला या शाळेत प्रवेश मिळावा अशी त्यांची मनोमन इच्छा होती आणि ही त्यांची इच्छा पूर्णही झाली. तिच्या पाठोपाठ मीही या शाळेत दाखल झालो. माझे आजोबा शिस्तप्रिय आहेत. त्यांना टी.व्ही. पहाणे, नाटक, सिनेमाला जाणे अजिबात आवडत नाही. पण जर शाळेचे कार्यक्रम असतील किंवा पैसे पाहिजे असतील तर ते नाही म्हणत नाहीत. या वर्षी आमची सहल कोल्हापूरला जाणार होती (दोन दिवस) म्हणून मी त्यांना भीत भीत ४०० रु. मागितले. त्यांनी लगेच मला ४०० रु. काढून दिले. मला खूप आनंद झाला.

त्यांनी देहदानासाठी कृष्णा चॅरिटेबल ट्रस्टमध्ये फॉर्म भरला आहे. अशा माझ्या आजोबांना उदंड आयुष्य लाभो ही सदिच्छा.

❑

# आणि परीक्षा दिली


**प्रथमेश इनामदार**

**इयत्ता ५ वी**

वार्षिक परीक्षेची धामधूम सुरू झाली होती. चहूकडून ग्यानबा तुकारामप्रमाणे अभ्यास करा हाच जयघोष कानी पडत होता. परीक्षा एका दिवसावर येऊन ठेपली. सगळी तयारी पूर्ण झाली. आदल्या रात्री सर्व विषयांची उजळणी करून झोपी गेलो. सकाळी उठलो. घसा दुखत होता. मी आईच्या कानावर ही गोष्ट घातली. आईने गरम मधपाणी देऊन, त्याच त्याच सूचना हजारवेळा रिपीट करून व शुभेच्छांसह पेपरला पाठवले. पेपर दिला, घरी आलो तरी अजूनही घसा दुखत होता: अचानक मला सणकून ताप भरला. ताप वाढला. आईने डॉक्टरांना दूरध्वनी करून परिस्थिती कानावर घातली. संध्याकाळी रूग्णालयात गेलो. स्टेथस्कोप छातीला टेकला. ऱ्हदयाची स्पंदने वाढली. थोड्याच वेळात रक्तदाबाच्या यंत्राचा पट्टा हाताभोवती आवळला गेला. गोळ्या दिल्या गेल्या. संपूर्ण रात्र तळमळत काढली. सकाळी उठून पेपरला गेलो. दुपारी रक्ततपासणीचा अहवाल आला आणि डॉक्टर वाचेपर्यंत श्वास रोखले गेले. रुग्णालयात दाखल करा हे शब्द आम्हाला बंदुकीच्या गोळीप्रमाणे वाटले. पायाखालची जमीन सरकली. मी सर्व भान विसरून भावनांना वाट मोकळी करून दिली. अशातच मी आईबाबांच्या मागे लकडाच लावला की ही गोष्ट कल्पितातार्ईच्या कानावर घालाच. त्यांनी माझी समजूत घालून मला रुग्णालयात नेले.

रुग्णालयात गेलो तर आम्हाला प्रतीक्षागृहात तिष्ठत बसवले. नेहमीप्रमाणे डॉक्टरांचा दूरध्वनी (मोबाईल) रुसलेला. येतीलच, येतीलच असा आश्वासनांचा भडिमार आमच्यावर झाला. ताप काहीही करून डोक्यात जाऊ देऊ नका म्हणून गार पाण्यात नळाखाली बसवले तर अंगात थंडी भरली. अशातच अंग थंड राहण्यासाठी बर्फाचा खडा हातात पडला. एखादा यात्रेकरू जसा डोळ्यात तेल घालून गाडीची वाट पाहतो त्याप्रमाणे आम्ही डॉक्टरांची वाट पाहत होतो आणि डॉक्टर आले. धावतपळत त्यांच्याजवळ गेलो. परिस्थितीची कल्पना दिली. त्यांनीही रुग्णालयात भरती करण्यास सांगितल्यावर माझी पाचावर धारण बसली. माझी रवानगी खोलीत झाली. सलाईन लावण्यासाठी शीरच सापडेना. शेवटी अंगाला दोन-तीन ठिकाणी सुईचा

स्पर्श झाल्यावर सापडली एकदाची! सलाईनची बाटली, ती नळी हे पाहून छातीत धडकी भरली कारण असा प्रसंग माझ्यावर पूर्वी कधीच आला नव्हता. काही सुचत नव्हते. घसा काहीही खाऊ देत नव्हता. थोडक्यात मी अगदी बेजार झालो होतो. थोड्याच वेळात पाणी आणि कसल्यातरी गोळ्या आल्या. पाण्यात बुडवून घडी ठेवण्यास सांगितले. रुमाल ठेवला. क्षणार्धात रुमालातून पाण्याचे बाष्पीभवनच. अंगावर पाणी ओतले तरीही तसेच. तिथला पंखा काठीने फिरवला तरी जोरात फिरेना असा होता. माझी होणारी मामी आली. तासा-तासानी डॉक्टर येत होते. थर्मामीटरनी माझा ताप तपासला जात होता. पारा १०४ ते १०५ च्याखाली येईना आणि मी माझा पेपर माझी परीक्षा हेच बडबडत राहिलो. सकाळी आईने कल्पिताताईंना बोलावले. त्यांनी धीर दिल्यावर माझा पारा खाली आला. पडून पडून कंटाळा आला होता. एक रात्र आम्ही तळमळत काढली. माझे वडील खाली झोपले. एका मैत्रिणीच्या आईने ट्रॉली उघडून दाखवली व कोणतेही सरबत घ्या. हक्काने या. कधीही मदत लागेल तेव्हा बोलवा. असे आपुलकीचे उद्‌गार निघत होते: ज़रा जरा उठायला लागल्यावर मागच्या हौदात अंघोळीचाकार्यक्रम पार पाडण्याचे ठरवले पण माझा तिथे बसण्यास असहकारच! **पान २६ वर**



## रेलगाडी


कितनी प्यारी रेलगाडी
जल्दी आती, जल्दी जाती
दौड-दौड वह धूम मचाती
जब गाडी स्टेशन पर आती
हम कहते है रूक-रूक-रूक
सामान रखकर जब हम चढते
वह कहती झुक-झुक-झुक
रेलगाडी-रेलगाडी
झुक-झुक-झुक-झुक-झुक-झुक

**मनाली साळुंखे**
**इयत्ता ६ वी**

## फिरकनी

मैं थी एक सुंदर फिरकनी,
फिरकनियों की मैं थी रानी।
घूमते समय मेरा कोना टूटा
तब मेरे आँखो से समुद्र फूटा।
उस दिन मैंने बहुत दुख पाया,
सावधानी से चलने का बोध दिल में समाया।
तब से आज तक गिरी नहीं मैं
घूम रही हूँ गोल-गोल मजे से मैं।

**श्रध्दा कुलकर्णी**
**इयत्ता ६ वी**



# चुना

**प्रितम पवार**

**इयत्ता ६ वी**

दिवाळीचे दिवस होते. आज तुळशीचे लग्न होते. नेहमीप्रमाणे आमच्याही घरात तुळशीचे लग्न होते. बाबांची आणि आईची तुळशी लग्नाची तयारी चालली होती. मी बाबांच्या हाताखाली काम करत होतो. बाबांना एखादी वस्तू घेता येत नसेल तर मी त्यांना द्यायचो. असेच मला एक काम बाबांनी सांगितले. बाबांनी मला तुळशीला लावण्यासाठी चुना आणायला सांगितला. तो मी आणायला निघालो. बाबांनी मला पाच रुपये दिले. मी ते घेऊन दुकानात गेलो आणि काकांना चुना मागितला. तो त्यांनी दिला आणि मी पाच रुपये देऊन माघारी पैसे न घेताच पळून आलो. बाबांनी मला चुना मागितला. मी तो दिला. माघारी दिलेले पैसे मागितले. तेव्हा मी काहीच बोललो नाही. बाबांच्या लक्षात आले की याने पैसे आणले नाहीत. बाबांनी चुना टेबलावर ठेवला आणि सांगितले, पुन्हा असे केले तर मार देईन आणि बाबा तयारी करायला निघून गेले. बाबांना जेव्हा चुना हवा होता तेव्हा चुना कोठे ठेवला आहे हे ते विसरले. सगळे घर चुना शोधत होते. मला अचानक टेबलावर चुना दिसला मी त्याला हात लावला. हाताला मऊ लागला. मला पुन्हा एकदा हात लाऊ वाटला. मी ती पुडी दाबली तेव्हा ती फुटली. मला काय करु काय नको ते सुचेना इतक्यात मला एक कल्पना सुचली. मी खाटेखाली जाऊन लपलो. बाबांनी मला चुना शोधायला हाक मारली. मी काही ओ दिली नाही. चुना तर सापडला पण मी गायब झालो होतो. परत मला शोधण्याची धावपळ झाली. एक तास झाला दोन तास झाले. मी काही सापडलो नाही. बाबा शोधायला बाहेर निघाले. दीदीला आधीच जोराची झोप आली होती म्हणून ती खाटेखालचे अंथरूण काढायला निघाली तेव्हा मी दिसलो. मी लगेच बाहेर आलो तेव्हा सगळ्यांच्या जिवात जीव आला. आईने बाबांना फोन केला. बाबा जेथे होते तेथून घरी आले व त्यांनी मला मिठी मारली.

❑

# आम्ही बैल असा बनवला

बैल बनवताना खूप मज्जा आली. बैल आम्हाला जमत नव्हता. शिंगे सारखी पडायची आणि बैलाचं तोंड वेगळं आलं. बैलाचं शरीर जमत नव्हतं आणि त्याचे पाय सारखे तुटायचे.नंतर हळूहळू शरीर जमलं. नंतर त्याचं तोंड केलं आणि चार पाय केले, शिंगे केली आणि शेपूट लावली. बैल तयार झाला.

**शुभम**
**इयत्ता पहिली (२००७)**




आम्ही शनिवारी बैल बनवला. मी पहिल्यांदा पाय बनवले आणि पाय तर हडकुळे आले. तोंड गाढवासारखे आले. नंतर अंग केले पण नीट आले नाही. दुसऱ्यांदा केले तरी नीट आले नाही मग तिसऱ्यांदा केले मग ठीक आले. नंतर पाय जाड केले. मग तो बैल चार पायांवर राहिला नंतर पडला. पण तो बैल दिसायला गाढवा सारखा आला.


**गौरी स्वामी**
**इयत्ता पहिली (२००७)**



पहिल्यांदा मी बैलाचे पाय तयार केले. त्याचे तोंड मला जमले नाही. पण मी प्रयत्न केला नंतर मी तोंडाला स्ट्रॉबेरीचा आकार दिला मग माझे शिंग आणि शेपूट विसरले मग माझ्या लक्षात आल्यावर मी शिंग आणि शेपूट बनवले. मग मी बाईंना व सरांना दाखवला. बाई व सर बरा आलाय म्हणाले. मी मळून बैल बनवला. मी पाच बोटे जुळवली आणि शिंग,पाय बनवले. मी मूठ झाकून त्याचे पोट बनवले. मला खूप खूप मज्जा आली. माझा बैलासारखा बैल जमला नाही एखादा वेगळाच प्राणी तयार झाला.

**समीक्षा दीक्षित**
**इयत्ता पहिली (२००७)**





मी अगोदर बैलाचे तोंड बनविले. नंतर पाय व शिंगे तयार केली. शेपूट तयार केले. काठीचे नाक बसवले. बियांचे डोळे बसवले. आधी दोन-तीन वेळा मला मान करता आली नाही. मग माझा बैल थोडासा बरोबर आला.

**मयूर गायकवाड**
**इयत्ता पहिली (२००७)**

# पायलट S S S पायलट

ईशान रानडे
इयत्ता ४ थी

लहानपणी मला विमानाबद्दल खूप आश्चर्य वाटायचे. विमानाचा आवाज ऐकल्यावर मी पळत पळत बाहेर यायचो आणि पायलट S S S पायलट अशा जोरा-जोराने हाका मारायचो. एवढे मोठे विमान हवेत उडते कसे? ही विमाने असतात तरी कोठे? आपल्या फलटणला विमानतळ असूनही विमाने का नाहीत? असे अनेक प्रश्न मला पडायचे.

अचानक एकदा म्हणजे मी दुसरीत असताना दुसऱ्या आजोबांना अमेरिकेला सोडायला मी सहार आंतरराष्ट्रीय विमानतळावर मुंबईला गेलो. अबब! अबब! केवढा मोठा पसारा! आपले अख्खे फलटण सामावून जाईल एवढे मोठे विमानतळ होते.

विमानतळावर प्रवाश्यांची, त्यांच्या सामानाची कडक तपासणी करतात. मगच पुढे विमानात जाता येते. तेथे सोडायला व आणायला आलेल्या लोकांना बससारखे विमानापर्यंत जाता येत नाही. म्हणून त्यांच्यासाठी एक वेगळा प्रतीक्षा कक्ष असतो. तसेच विमानाच्या पार्किंगला हँगर म्हणतात. तेथेच त्यांची दुरुस्ती वगैरे होते. अशी माहिती मला आजोबांनी दिली.

विमानतळावर पोहोचलो पण अजून विमान कोठे पाहिले? माझी उत्सुकता वाढू लागली. "मला विमान बघायचंच! मला विमान बघायचंच अशी भुण भुण मी सुरू केली. माझे आजोबा म्हणाले "आपण ह्या आजोबांना सोडल्यावर विमान बघुयात हं!"

पण प्रतीक्षालयात जाणारी व येणारी विमाने नीट दिसू शकत नव्हती. शेवटी आम्ही बाहेर पडलो. आणि धावपट्टीच्या कंपाऊंडजवळ उभे राहीलो पण मी उंचीने कमी असल्याने मला आतली विमाने दिसत नव्हती. आता काय करावे असा विचार करत असतानाच आम्हाला एक सोडलेली बैलगाडी दिसली. आम्ही त्या बैलगाडीवर उभे राहून विमाने पाहू लागलो. एअर बस, बोईंग अशी मोठमोठी, विविध कंपन्यांची, विविध देशातील विमाने मला दिसत होती. उडताना व उतरताना कानठळ्या बसविणाऱ्या कर्कश आवाजामुळे माझ्या कानात दडे बसले.

असेच एक विमान उड्डाण करून आमच्या डोक्यावरून जात असताना मी मान वर करून बघत होतो. त्या अजस्त्र विमानाकडे बघता बघता आम्ही

बैलगाडीच्या एका कडेला आलो आणि बैलगाडी उलटली मी धप्प-दिशी पडलो. पण विमाने बघण्याच्या आनंदापुढे मला काहीच वाटले नाही. त्यानंतरही आणखी कितीतरी वेळ आम्ही विमाने पाहत उभे राहिलो . अजूनही विमानांचा आवाज ऐकून मी बाहेर पळत येतो व नेहमीच्या सवयीप्रमाणे पायलट S S S पायलट. . . अशा हाका मारतो.

❑

---

# पाऊस

पाऊस रात्री मोठा आला होता. पाऊस आला आणि गेला. मी म्हणाले पावसाची रिमझिम थांबली रे. पाऊस आला. माझ्या मनात आले की पाऊस जास्त मोठा येणार नाही. पण पाऊस जास्त मोठा आला. आमच्या गेटमध्ये जास्त चिखल झाला. सकाळी शाळेत येताना वड्याला जास्त पाणी होते. तुम्हाला सांगू काय, रोडवरून पाणी चालले होते. पण पाणी कमी झाल्यावर आम्ही शाळेत आलो. शाळेतील मैदान पाण्यानी भरले होते चिखल झाला होता. वर्गात गेलो. वर्गातही पाणी. पाऊस झाला तो चांगला झाला.

**सायली महांगडे**
**इयत्ता पहिली (२००६)**

पाऊस धो धो पडत होता. माझ्या घराच्या जवळ पाणी साचलेले होते. मला असे वाटले की नदी वहात आहे. मी व माझा भाऊ पावसात छान भिजत होतो. लाइट गेली आणि मी घाबरून गेले. लाइट येयच्या आधी झोपले. आमच्या घराच्या जवळ छोटे छोटे गवत उगवून आले.

**ज्योती मसुगडे**
**इयत्ता पहिली (२००६)**

# सहलीतील सातारा

**अक्षता मगर**

**इयत्ता ५ वी**

सगळेजण खुर्चीत शांतपणे बसलेले होते. यावर्षी सहल कुठे जाणार याबद्दल ठरवाठरवी चालली होती. शेवटी सातारा नक्की झाला. काय बघायचे, कधी निघायचे सर्व नक्की झाले. मग तर भिंतीच्या कोपऱ्यात बसलेल्या माझ्या शांत निराश भावाच्या चेहऱ्यावर मंद स्मित झळकले. आम्ही रात्रीच सामान बांधले. उद्याच्या सकाळची मी आतुरतेने वाट पाहत होते.

झाले! सकाळ झाली. गरम गरम जेवणाचे डबे भरले. चटणीचा सुगंध दरवळत होता. मी तयार झाले. सर्वजणही तयार झाले. पहाटे सहा वाजता गाडी निघाली. दुपारच्या उन्हापेक्षा हवेत गारवा होता. आम्ही जसे पुढे गेलो तसे हिरवीगार झाडे,सुंदर सुगंधी फुले, तर काही पिवळी धमक फुलझाडे माझे लक्ष वेधून घेत होती. मी त्यात रमले होते. तेवढ्यात झिमझिमणाऱ्या सरी कोसळल्या आता तर हवेत गारवा होताच पण आता भन्नाट वारा घुमू लागला होता. आपले इवले इवले पंख सांभाळत चिऊताई उडून झाडाचा आसरा शोधू लागली. हे सर्व दृश्य पहात आम्ही सर्व केव्हा सातारला पोहोचलो ते कळलेच नाही.मग आम्ही थेट 'प्रकृती' दवाखान्यात आजीला भेटायला गेलो. तिथे तर खूप झाडे होती व पावसाच्या त्या एका सरीने ती हिरवीगार झाडे हसत हसत आपल्या अंगावरचे पाणी झटकत होती. "येरे येरे पावसा" हे गाणे गात डुलत होती. आम्ही आजीला भेटलो. तिने आम्हाला सारी बाग फिरविली.तेथे वाघासारखी दोन धिप्पाड कुत्री होती व वर बघताच माकडदादा सलाम करत होते. तर पिवळी,लाल,जांभळी अशी डौलदार फुले डोलत होती. कृष्ण कमळे व कमळे लवकर उमलून हा सारा निसर्ग बघण्यासाची घाई करत होते. असा सगळा चाललेला तो खेळ बघून झाल्यावर ठरल्याप्रमाणे आम्ही कास तलाव बघण्यासाठी निघालो. यवतेश्वरच्या रस्त्याने जाताना खोल दरीत हिरवळ, त्यात लपलेला सातारा,डाव्या बाजूला डोंगर व मोठे मोठे पाषाण तर वर निळसर आकाश व समोरील नागमोडी वाट; हे पाहता पाहता मन रंगून गेले मग आम्ही कास तलावाकडे गेलो. वर बघताच कधी न पाहिलेले असे निळे आकाश.

**पान ३४ वर**

## दळणवळण

मुलांना घेऊन एक जाई स्कूलबस
थांबताना आवाज करी फस फस फस
प्रत्येकच मुलाला ती म्हणते बस
मुलांना घेऊन एक जाई स्कूल बस

प्रवाशांना घेऊन जाते एक रेल्वे गाडी
खिडकीतून दिसते हिच्या हिरवीगार झाडी
सामानाने भरलेली असते तिची माडी
प्रवाशांना घेऊन जाते एक रेल्वे गाडी

पांढरे पांढरे मोठे जाई हो विमान
उडताना त्याची असते नेहमीच सरळ मान
आकाशातून उडताना दिसते किती छान
पांढरे पांढरे मोठे जाई हो विमान

**शेषा जोशी**
**इयत्ता ६ वी**

## विधाता

अगर विधाता मैं जो होती
आसमान पर बगीचा बनाती

आसमान से तारे लाती
जल से सागर भर देती

वर्षा से पुस्तक बरसाती
पेडों पर दिन भर डेरा जमाती

अगर विधाता मैं जो होती
आसमान पर बगीचा बनाती

पक्षी जैसी उडती रहती
आसमान को छूती रहती

तारों को मैं बाँटती
सबकी वाहवाही पाती

अगर विधाता मैं जो होती
आसमान पर बगीचा बनाती

**मयूरी जाधव**
**इयत्ता ६ वी**

# देखो तुम्हारा बच्चा गिर रहा है


**श्रद्धा कुलकर्णी**
**इयत्ता ६ वी**

मला प्रवासाची भयंकर आवड आहे. सुट्टीत आम्ही काही ना काही कारणांनी प्रवास करत असतो. प्रत्येक प्रवासात काही ना काही गंमती घडत असतात. त्यातीलच एक प्रसंग--

आम्ही घरातील सर्वजण, माझी एक मैत्रिण, माझा भाऊ आदित्य व त्याचा मित्र असे सारे एका जीपमधून महाबळेश्वरला जायचे ठरविले. सोबत पाण्याचे कॅन, दुपारचे जेवण, कॅमेरा, अजून किरकोळ गोष्टी होत्या. आम्ही सकाळी लवकर निघालो. सर्वांना बरोबर घेऊन गावाबाहेर पडेपर्यंत नुकतेच उजाडले होते. ९ वाजेपर्यंत आम्ही पाचगणीला पोहोचलो. मग आम्ही टेबललँडवर फिरलो. तिथे बरेच उंट, घोडे यांच्या सवाऱ्या होत्या. खाद्यपदार्थांचे बरेच स्टॉल होते. आम्ही सर्वांनी आईस्क्रीम खाल्ले. आमच्या हातातील शेंगदाण्याच्या पुड्या माकडांनी ओढून घेतल्या त्यामुळे अचानक आलेल्या माकडांमुळे मी खूप घाबरले. मग आम्ही प्रतापगडाकडे गेलो. प्रतापगडाच्या पायथ्याशी आम्ही १२ वाजता पोहोचलो. प्रतापगड चढताना आम्ही गार गार मडक्यातील ताक प्यायलो. त्यामुळे आमचा गड चढतानाचा थकवा दूर झाला. मग वर पोहोचल्यावर आम्ही सर्व गड फिरलो व तेथेच बागेत जेवलो. तेथे शिवाजीमहाराजांचा अश्वारूढ पुतळा आहे. आम्ही भवानी मातेचे दर्शन घेतले व तिथेच शेजारी असणारी अफजलखानाची कबर पाहिली. मग आम्ही गडावरून खाली उतरून गाडीत बसलो. महाबळेश्वरला जाताना आम्हाला घाट लागला. आम्ही सर्व मुले गंमत करण्यासाठी मागे बसलो होतो. भरपूर जेवण झाल्यामुळे सर्वांनाच गुंगी येत होती. माझी मैत्रिण रीया व मी आईच्या मैत्रिणीच्या मांडीवर झोपलो होतो. समोरच्या सीटवर दाराशेजारी आदित्य झोपला होता. घाटाला खूप वळणे होती. गाडी सारखी उजवीकडून डावीकडे व डावीकडून उजवीकडे वळत होती आणि अचानक आदित्यच्या पायाने दाराची खिटी उघडली व आदित्य बाहेर घसरला तेवढ्यात सावध असलेल्या दीदीने आदित्यचा हात धरला व आदित्यने दाराचे हँडल घट्ट पकडून ठेवले. रीयाने त्याचे केस धरले. आदित्यचे डोके व हात गाडीच्या आत होते व बाकीचे शरीर अधांतरी लोंबकळत होते. अजून त्या


दोघींशिवाय पडलेल्या आदित्यबद्दल कुणालाही माहित नव्हते. त्यामुळे गाडी तशीच वेगाने पुढे जात राहिली. एका वळणावर रियाकडून अदित्यचे धरलेले डोके निसटले. आता आदित्य पूर्णपणे एका हाताच्या आधारावर गाडीच्या बाहेर उडत चालला होता. त्या दोघीही ओरडत होत्या. पण बाकीच्यांना गप्पांच्या नादात त्या घाटाबाहेरील झुडपे बघून ओरडत असाव्यात असे वाटले. मागून आलेल्या ड्रायव्हरने आम्हाला सांगितले की "देखो तुम्हारा बच्चा गिर रहा है।" मग कुठे आम्हाला काहीतरी कळले. मीही तेव्हा उठले. मग ड्रायव्हरने गाडी हळू हळू थांबवली व आदित्य खाली पडला. मग आम्ही खाली उतरलो व आदित्यला काही लागले का ते बघितले सुदैवाने आदित्य अधांतरी असल्यामुळे त्याला फक्त खरचटले होते. मग मात्र अचानकपणे झालेल्या अपघाताने आम्ही चांगलेच घाबरलो. त्याला पाणी देऊन त्याचे कपडे बदलले. आम्ही महाबळेश्वर मध्ये पोहोचलो, २-३ पॉइंट बघितले ते पण सावधपणे आम्ही बोटिंग करायला वेण्णालेक कडे गेलो. तेथेही बोटीत छोट्या मुलांना मध्ये घेऊन व कडेला मोठ्या माणसांना बसवून सावधगिरी बाळगली. तेव्हा संध्याकाळचे ७ वाजले होते. परत येताना मागे मोठी माणसे बसली व मध्ये आम्ही बसलो.येताना एका हॉटेलमध्ये आम्ही जेवण केले व रात्री १० वाजता घरी पोहोचलो. येताना व दुसऱ्या दिवशीही आम्हाला तो प्रसंग सारखा आठवत होता.

❑



# आई हरवली

**शुभम कांबळे**
**इयत्ता ४ थी**



४ डिसेंबर, वार मंगळवार, साल २००७ हा दिवस मी कधी विसरणार नाही. कारण त्या दिवशी आम्ही मुंबईत हरवलो होतो. माझ्या काकींच्या बहिणीच्या लग्नासाठी आम्ही ३ डिसेंबरला गोरेगावला गेलो होतो. लग्नसमारंभ उरकून ४ डिसेंबरला सगळे म्हणजे मी,आई, पप्पा,आजी, केशर आत्या, महेश काका, रविंद्र काका, चैतन्य,शिवानी गोरेगावाहून दादरला यायला निघालो. तो दिवस माझ्यासाठी खूपच खराब होता. माझी आई आणि केशर आत्या एका ट्रेनमध्ये चढल्या. आम्ही ट्रेनमध्ये चढत असताना ट्रेन सुरू झाली. त्या दोघीच ट्रेनमध्ये निघून गेल्या. हे बघून माझे अंग थरथर कापू लागले. मी खूप घाबरलो. काही सेकंदाने दुसरी ट्रेन आली. त्या ट्रेनमध्ये मी, शिवानी, आणि आजी चढलो, ट्रेन सुरू झाली. आणि मी बघितले माझे पप्पा, दोन्ही काका, आणि चैतन्य खालीच राहिले. हे पाहून

आम्ही खुप भेदरलो. आपण काय करायचे आम्हाला कळेना. त्यावेळी आमचा हा सगळा प्रकार बघणाऱ्या ट्रेनमधल्या मुलीने आम्हाला सांगितले की ही ट्रेन फक्त अंधेरी पर्यंतच जाते. तसे तिने पप्पांनाही ओरडून सांगितले. आता आमचे कसे होणार? आधीच्या ट्रेन मधून गेलेल्या आई, आत्या आता कोठे असतील? त्या आम्हाला कश्या भेटतील? पप्पा, काका अंधेरीला आमच्याकडे आता कधी पोचतील? अशा अनेक प्रश्नांनी माझी भीती वाढत होती.मी रडायला सुरुवात केली. शिवानी आणि आजी पण खूप घाबरल्या होत्या, पण कशीबशी माझी समजूत घालीत होत्या. आम्ही अंधेरीमध्ये उतरलो. त्या मुलीने आम्हाला खूप मदत केली. तिने सर्व माहिती सांगितली आणि कोठेही जाऊ नका म्हणून सांगितले. पाच सहा ट्रेन येऊन गेल्या तरी कोणीच आले नाही म्हणून आम्ही दादरला जाणाऱ्या ट्रेनमध्ये चढलो. माझ्या आजीला भीती वाटू लागली कारण आमच्या ट्रेनची तिकिटे आमच्याकडे नव्हती.पण दादरपर्यंत आम्ही सुखरूप पोहोचलो. पप्पाही आमचा शोध घेत घेत दादरपर्यंत पोहोचले होते. ते प्लॅटफार्मवर उभे होते. शिवानीला पप्पा दिसले आणि तिने त्यांना हात केला. त्यावेळी माझी भीती जरा कमी झाली. रेल्वेतून उतरून मी रडत रडत पप्पांकडे पळत सुटलो आणि त्यांना मिठीच मारली. पण आई आणि आत्या अजून सापडल्या नव्हत्या. हे ऐकून माझी भीती पुन्हा वाढू लागली. मग महेशकाकांनी आम्हाला एका जागी बसविले. पप्पा, महेशकाका, रविंद्रकाका हे तिघेही आईला, केशर आत्याला शोधायला गेले. माझ्या पप्पांनी अनौंसिंग करून माझ्या आईला प्लॅटफॉर्म क्रमांक ४ वर बोलावले. तेवढ्यात आईचा फोन आला की आम्ही प्लॅटफार्म नं.२ वर आहोत. पप्पांना तेथेच आम्हाला न्यायला पाठव. आता माझी भीती पूर्णपणे नाहीशी झाली. पप्पा आईला घेऊन आले. मग आम्ही सर्वजण एका ठिकाणी बसलो. पाणी प्यायलो. सकाळी १०वाजल्यापासून चाललेले हे नाटक दुपारी २ वाजता संपले. दादरहून पुण्याला येणाऱ्या रेल्वेमध्ये सर्वजण एकत्र बसलो तेव्हा कुठे माझ्या जिवात जीव आला. फलटणला पोहोचेपर्यंत सगळ्या घटना आठवून आठवून आम्ही हसत होतो. पण ते भीतीचे ४-५ तास आम्ही कधीच विसरणार नाही.

❑

# नरसोबाची वाडी

**विश्वजित भोकरे**

**इयत्ता ६ बी**

मी मोठ्या गटात असतानाची ही सत्य घटना आहे. घरातील आम्ही सर्वजण श्री क्षेत्र नरसिंह सरस्वती स्वामी (नरसोबाची वाडी) ला गेलो होतो. पावसाचे दिवस होते. मंदिरासमोर कृष्णा नदी वाहते. मंदिराच्या समोर भरपूर पायऱ्या आहेत पायऱ्या उतरल्यावर कृष्णा नदी आहे. नदीला पाणी भरपूर होते. ते मंदिर वर्षातून एकदा पूर्ण-पणे पाण्याखाली जाते. अगदी कळस सुध्दा दिसत नाही. त्यावेळेस तेथील पूजेची भांडी, स्वामींच्या पादुका, वगैरे असे सामान मंदिरातून दुसरीकडे ठेवतात. असे म्हणतात की स्वामींना भेटण्यासाठी कृष्णा नदी मंदिरापर्यंत येते. आम्ही मंदिरात गेलो. त्यावेळेस सुध्दा नदीचे पाणी पायऱ्या वर चढत होते. माझे मोठे काका, काकी, आजी हे पूजेस बसले होते. मी, बाबा, आई, बहीण, हे सर्वजण कृष्णा नदीचे पाणी बघत पायऱ्यांवर उभे होतो. नदीचे पाणी वर चढत होते. माझ्या हातात छोटी प्लॅस्टिकची गाडी होती. ती मी पायऱ्यांवरील पाण्यात फिरवताना माझा तोल गेला व मी पाण्यात पडलो. क्षणभर कोणाला काहीच कळले नाही. पाणी गढूळ होते. मी खाली बुडत होतो. तेवढ्यात माझ्या बाबांनी पाण्यात उडी मारली. माझा शर्ट पकडला व मला पाण्याच्या बाहेर खेचले. मी घाबरून खूप रडत होतो. माझी आईही रडत होती. बाबांच्या पायाला व हाताला खरचटले होते. आमच्याभोवती बरीच माणसे जमली होती. सगळ्यांचा एकच गलका चालू होता. काय झाले? लागले का? मुलगा ठीक आहे का? तेवढ्यात तेथे मुख्य पुजारी आले ते म्हणाले दत्त महाराजांची कृपा म्हणून तुमचा मुलगा हाती लागला. आतापर्यंत नदीच्या पुरात बरीच माणसे वाहून गेली आहेत.

त्यानंतर मी मोठा झाल्यावर पाण्यात पोहायला शिकलो व पाचगणी येथे पोहण्याच्या आंतरशालेय स्पर्धेत दुसरा क्रमांक मिळवला.



## झाडाचे मोल

झाडे आहेत मोलाची
त्यांची किमत माणसाला नाही कळायची
का तोडतात ही माणसे झाडे?
झाडे आपल्याला जगवतात
हे त्यांना कसे कळत नाही बरें
एका गावात भरपूर झाडे होती
तेथील माणसांनी तोडली सारी
केली उभी घरे
पाऊस पडला कमी
धान्य पिकले नाही
माणसे लागली रडू
लागली झाडे लावू
म्हणून म्हणते
नका तोडू झाडे
पर्यावरण वाचवा
नाही तोडणार झाडे
ही शपथ घेऊन टाका

**आरती गायकवाड**
**इयत्ता ५ वी**

## प्राणी पक्षी

एक होती चिमणी
गाते गोडगोड गाणी
एक होता पोपट
करतो भारी वटवट
एक होती गाय
म्हणते कसं काय
एक होता ससा
म्हणतो सारखे हसा.
एक होता बोकड
खातो कुरू कुरू पापड
एक होता हत्ती
करतो सारखी मस्ती
एक होता बोका
खेळतो खूप झोका
एक होती माऊ
मला देते खाऊ
एक होता कुत्रा
होता फार भित्रा
एक होता कोंबडा
खातो बटाटे वडा

**प्राजक्ता काकडे**
**इयत्ता ५ वी**

# गोम्या

**श्रीरंग उंडे**

**इयत्ता ६ थी**

मी मागच्या वर्षीच्या सुट्टीत नगर जिल्ह्यात मालुंजा येथे आजोळी गेलो. जवळ जवळ पंधरा दिवस मी तेथे राहिलो. प्रवरा नदीच्या काठी हे गाव आहे. आम्ही त्या नदीच्या पात्रात खूप पळापळी खेळायचो. खेळता खेळता माझ्या मामे भावाने मला एका झाडावर एक माणूस दाखविला अन् सांगितले की तो झाडावरच राहतो. मला खूप उत्सुकता लागली की हा माणूस झाडावर कसा राहतो? मी त्या झाडाजवळ गेलो अन् काका काका अश्या हाका मारल्या. त्यांनी विडी पेटवली अन् वरून खाली पाहिले. हा माणूस खरेच झाडावर राहतो का ? कसा राहतो? सारखे प्रश्न विचारून मी मामाला हैराण केले.

दुसऱ्यादिवशी तो माणूस सायकलवरून जातांना मामाने मला दाखविला व म्हणाला तुला संध्याकाळी तो झाडावर राहतो तेथे नेईन. मला खूप आनंद झाला. कधी संध्याकाळ होते अन् मला मामा घेऊन जातो असे झाले. संध्याकाळी सात वाजता मी आई, बाबा, माझे दोन मामा, मामी आणि मामेबहीण सारेजण त्या झाडाकडे निघालो. मामा म्हणाला झाडाखाली चप्पल बघ आहेत का? मी पाहिले चिंचेच्या झाडाखाली चपला होत्या. मग मी मामाला म्हटले, "मार की रे त्या माणसाला हाका." मामाने गोम्या ओ गोम्या अश्या हाका मारताच त्या गोम्या काकांनी एकदा खाली पाहिले व कोण आण्णा व्हय ? म्हणून खाली वाकून हात केला. त्याबरोबर मामानी त्याचा फोटो काढून घेतला. मग आम्ही कितीतरी वेळ त्याचे घर वर माना करून पाहत होतो. मान दुखून आली. मग आम्ही नदीत बसलो. वाळू उपसणारे ट्रक नदीच्या पात्रात बघून खूप वाईट वाटले. एवढे मोठे पात्र कोठे कमी कोठे जास्त दिसत होते.

मग मी पुन्हा मामाला विचारले, "हे झाडावर घर त्यांनी कधी अन् का बांधले?" त्यावर मामा म्हणाला वर्ष झाले त्याने इथे घर बांधले. त्याला बायको मुले आहेत. ती गावात राहतात. रोज सकाळ संध्याकाळ बायको डबा व एक कळशी पाणी झाडाखाली आणून ठेवते. गोम्याने वर्षापूर्वी चार- पाच लाकडे आणून हे भक्कम घर बांधले वर प्लॅस्टिकचा कागद टाकला. वारे आले तरी घर पडत नाही मला मात्र खूप भीती वाटली. पावसाळ्यात जोरात वारे, विजा असायच्या, लाइट नाही.

कसे राहतात ना! आंघोळ करतात व लाकडे फोडायचे काम करतात. संध्याकाळ व्हायच्या आत परत झाडावर चढतात व दुसऱ्या दिवशीच परत खाली येतात. खरेच कसे लोक राहतात मला आश्चर्य वाटले. मी मामाला म्हणालो तो माणूस कोणाला सांगत का नाही तो इथे का राहतो ते? त्याची बायका मुले त्यांना घरी का नेत नाहीत? मामा म्हणाला सर्व गोष्टी सांगून झाल्या.पण तो कुणाचे ऐकत नाही. मी खाली राहिलो तर मी मरेन म्हणतो. त्याने घर सोडून दोन वर्षे झाली. एक वर्ष तो नदीत राहिला. नदीला पाणी आले तेव्हा झाडावर गेला.

खरेच ह्या जगात किती लोक कसे राहतात. किती माणसे अन् किती राहण्याच्या पद्धती.

❑

---

## स्वयंपाक

स्वयंपाकाचा येई सुंदर वास
स्वयंपाक बने हा कोणासाठी खास
आज नाही कोणाचाही उपवास
म्हणून जेवणात मटण आणि मास
करू नका काहीही नास
पोट भरलयावर येईल मोठा श्वास

**वैष्णवी हेन्द्रे**
**इयत्ता ४ थी**

## राणीचे आजारपण

एक राणी आजारी पडली
दोन दिवस पलंगावर झोपली
तीन डॉक्टर तपासण्यासाठी आले
चार गोळ्या देऊन गेले
पाच वेळा तिने गोळ्या खाल्या
सहा मुले पाहण्यास आली
सात फुले देऊन गेली
आठव्या दिवशी आंघोळ केली
नवव्या दिवशी बागेत गेली
दहा फळे एकदम खाल्ली

**अमीन मुल्ला**
**इयत्ता ६ वी**

# कमल्याचा तमाशा

रणजित गुंजवटे
इयत्ता ६ वी

उन्हाळ्याची सुट्टी होती. आमची जत्रा उद्या होती. तमाशा आज संध्याकाळी होता. काय कळत नसायचं तरी आम्ही तमाशाला जायचो. मी आणि कमल्या तमाशाला गेलो. सरपंचाने नारळ फोडून तमाशा सुरू केला. गवळणी झाल्या, गाणी झाली आणि मुख्य तमाशा संपताच मुलं आपापल्या घरी जाऊ लागली. कमल्या म्हणाला मी पण घरी जातो. मी म्हणालो जा. मग मी वगनाटय बघत बसलो. वगनाट्य संपल्यावर मी घरी गेलो. घरी गेलो तर कमलेश अजून घरी नाय आला. मी म्हणलं घरात झोपला असेल. आम्ही सर्व घर फिरलो पण कमल्या काय सापडेना. मग कमलेशची आई सुध्दा रडू लागली. कमलेशच्या वडिलांनी मला अशी एक सनसनीत चापट लावली की मला तिरीमिरी आल्यासारखं झालं. तसाच मी किविलवाना चेहरा करून परत कमल्याला हुडकायला गेलो. पण कमल्या काय सापडंना झाला, मग मी कंटाळून तितल्या एका वाळूच्या ढिगाऱ्यावर बसलो. फिरल्यामुळे मला तिथेच झोप लागली. सकाळी उठून पाहतो तर कमल्याच मला म्हणतोय आरं यड्या, इथं कुठं झोपलाय? घरी चल. खरं तर कमल्या त्याच ढिगाऱ्यावर झोपला होता. मग आम्ही दोघं घरी गेलो.

तवापासून कमल्याला घेऊन कुठल्या तमाशाला गेलो नाही.



# शामरावांची झोप

इटुकले मिटुकले टुमदार घर
पण त्यात पसारा ढीगभर

इकडे कपडे; तिकडे भांडी
पाण्याची तर सांडासांडी

ग्रंथ-पाथी फाटलेल्या
रद्दीसाठी साठलेल्या

गोदामात होती धान्याची पोती
उंदिरमामा ती कुरतडीत होती

घराशेजारी गुरांचा गोठा
तिथे साठला शेणाचा साठा

भिंतीवरती होत्या पाली
कोळ्यांची तर जाळीच जाळी

बागेतील झाडे वाळून गेली
फुले तर कोमेजून मेली

भुंग्यांचे गाणे बंद झाले
डासांचे गुणगुणणे सुरू झाले

उंदरांनी केले गोदाम फस्त
तरीही शामराव झोपलेत सुस्त

शामराव आता उठणार कधी
वाट पहायला नकोच त्यांची

**स्नेहल कदम**
**इयत्ता ६ वी**



# घेण्याच्या नावाने शिमगा

संदीप राठोड

इयत्ता ६ वी

रविवारचा दिवस. त्या दिवशी दुपारी करमत नव्हते.लाईटही नव्हती म्हणून आम्ही सर्वजण ओट्यावर गप्पा मारत होतो.

तेवढ्यात साडी s s s साडी असा आवाज आला. आणि आमच्या शेजारची भाबी बाहेर आली. तिला कोणाचा जरी आवाज आला तरी त्यास थांबविणार, त्याची विचारपूस करून त्यास बिंगवून सोडून देणार हा तिचा गुणधर्म आहे. भाबीने साडीवाल्यास थांबविले व म्हणाली "ओ ये साडी कितने को है?" तो म्हणाला "यह साडी बारासो को है।" त्यावर तिचे नेहमीचेच म्हणणे कम करो कि किंवा क्या बकते हो । हेच तिचे रडगाणे तसेच तिने त्या माणसाला केले त्याला म्हाइत न्हवते की ती घेणार नाही ती म्हणाली "क्या बकते हों । थोडा कम करो. त्याने ती साडी ८०० वर आणली परत ती म्हणाली ओ थोडा और कम करोकी. ती साडी ७०० वर आणली. परत तिचे रडगाणे सुरू क्या बकते हो हमारे यहाँ तो सामनेवाली अपार्टमेंट वालीने ५०० को लाई है. त्याला कळले नाही की ही आपली साडी घेणार नाही त्याने त्या साडीचा दर ५०० वर आणला. परत ती म्हणाली थोडा कम करो. त्याने त्या साडीचा दर ४०० वर आणला. मग ती परत म्हणाली ओ थोडा और कम करो की त्याने ती साडी २०० वर आणली. त्यावर ती म्हणाली रहने दो हमारे पास है ये साडी. त्याला इतका राग आला तो बडबडत चिडून निघून गेला . आम्ही इकडे खूप हसलो. भाबीचा टाइमपास झाला. आमचाही वेळ छान गेला. पण त्याचा वेळ बरबाद झाला आणि आम्ही इकडे हसतच राहिलो.

❑



# म्हाळुंग्याचा प्रसंग

ऋतुराज कदम
इयत्ता ५ वी

मी माझ्या मामाच्या गावी म्हाळुंग्याला गेलो होतो. हे गाव अकलूजपासून ७ कि.मी. अंतरावर आहे. माझ्या मामाचे घर वस्तीवर आहे. तिथे जाऊन नुकतेच दोन दिवस झाले होते. दुसऱ्या दिवशीची रात्र होती. आम्ही सर्वांनी जेवण केले आणि सर्वजण ओट्यावर बसलो होतो आणि गप्पा मारत होतो. अर्धा-पाऊण तास होऊन गेला. गप्पा चांगल्याच रंगल्या. भुतापासून नातेवाईकांपर्यंत विषय गेले. थोड्या वेळाने सर्वांना झोप आली. त्यावेळी घड्याळात अकरा वाजले होते. सर्वजण आपआपल्या रूममध्ये झोपायला गेले. माझा एक मामा सोलापूरला कामानिमित्त गेला होता. त्याची रूम मोकळीच होती. आई मला म्हणाली त्या रूममध्ये झोप. पण मी आईचे ऐकले नाही. मी आजोबांशेजारी ओट्यावर झोपलो. आजोबांना गाढ झोप लागली. ते घोरायला लागले. उन्हाळ्याचे दिवस होते. फार उकडत होते. तेवढ्यात जोराचा वारा सुटला. मला नेमकाच डुलका लागला होता. तोच जोराच्या वाऱ्याने, आंब्याच्या झाडाची फांदी पडली आणि मला एकदम जाग आली. मी उठलो घराच्या दारात असलेल्या डेऱ्यातले पाणी प्यायलो आणि अंथरुणात पडलो. १५-२० मिनिटे झाली, मला काही झोपच येईना. मी पुन्हा उठलो, बघतो तर काय माझे आजोबा जागेवर नाहीत. हे पाहताच मला आश्चर्याचा धक्काच बसला. मी पुन्हा इकडे तिकडे बघितले. मला काहीतरी पिवळे पिवळे दिसले. ते पाहून तर मला काहीच सुचेना. दुष्काळात तेरावा महिना यासारखी तऱ्हा झाली. एक तर आजोबा गायब. दुसरे म्हणजे पिवळा प्रकाश. आता मला नक्कीच वाटले आणि पटले की ही माझी शेवटची रात्र. घरात जावे म्हटले तर घराला कुलूप आणि त्याची चावी आजोबांकडे. आता माझे डोकेच चालेना. मला त्या पिवळ्या प्रकाशाकडे बघू वाटत नव्हते तरी सुध्दा मी तिकडे बघितले तर काय तो प्रकाश अजूनच जवळ आलेला होता. आता माझ्या तोंडचे पाणी पळाले. मी पटकन पडलो, अंगावर चादर ओढून घेतली आणि झोपण्याचा प्रयत्न केला. मात्र मला झोप आली नाही आणि त्या प्रकाशाचा विचार डोक्यात येऊ लागला. मी पुन्हा उठून त्या प्रकाशाकडे बघितले तर प्रकाश अजून जवळ येऊ लागला होता. माझी भीती

अजूनच वाढली. मग चादर घट्ट ओढून धरली आणि झोपलो. सुदैवानं मला झोप आली. बघता बघता सकाळ झाली. मी उठलो. दारात गाडी उभी होती. सर्व जण उठले होते. काही जणांचा ब्रश चालला होता, तर काही जणांचा नाष्टा. सोलापूरला गेलेल्या मामाने मला विचारले तू माझ्या गाडीकडे रात्री का बघत होता? मग मला रात्रीची घटना आठवली आणि मी रात्री झालेली सारी हकीकत सर्वांना सांगितली आणि एकदम मला आजोबांची घटना आठवली. आजोबा मला कुठेच दिसले नाहीत. मला आजोबांची काळजी वाटू लागली. मी त्यांना शोधू लागलो. तोच ते आंघोळीवरून बाहेर आले. मला त्यांना पाहून फार आनंद झाला. मी त्यांना विचारले तुम्ही रात्री कुठे गेला होता? ते म्हणाले विहिरीवर मोटार चालू करायला. हे उत्तर ऐकताच सर्वजण हसू लागले आणि मी आंघोळीला पळून गेलो.

❑

---

## घोडा

घोडा आया घोडा आया
खंबे जैसे पैर उठाता
टॉक-टॉक पैर उठाता
मस्ती से चलता कूँदता
नाच-नाच कर घोडा आया
बच्चों ने भी शोर मचाया
घोडा आया घोडा आया
घोडा आया घोडा आया

**स्वप्निल थोरात**
**इयत्ता ६ वी**

## मेरा स्कूल

मेरा स्कूल, मेरा स्कूल
जैसा कोई गुलाब का फूल
जो शरारती बच्चे मेरे स्कूल में पढे
सीधे हो गए सारे बच्चे जो थे अकडे
मेरी अध्यापिका सिखाती प्यार का पाठ
हमें कहती भारत में मिलकर ही रहना हैं
तुम गीत गाओ प्यार का
जितना पानी सागर का
वह नहीं करती भेदभाव हम में
तो क्यों करे  हम भी आपस में?

**हर्षा भट्टड**
**इयत्ता ५ वी**

# आई. . . सॉरी


सौरभ शिंदे
इयत्ता ८ वी

मी ओरडत ओरडत माझ्या जुन्या, छोट्या खोलीत गेलो. आज माझे आणि आईचे जुंपले होते. मला वरची मोठी खोली हवी होती. छोट्या खोलीत माझे सामान मावत नव्हते म्हणून मी वरची खोली आईला मागितली तर ती म्हणाली, "तू अजून छोटा आहेस, तुला वरची खोली कशाला हवी?" आणि तिने मला वरची खोली नाही दिली. मी मग ओरडत-ओरडत खोलीत आलो आणि आई बाजारात गेली. घरात मी एकटाच होतो. एकदम माझ्या मनात काहीतरी आले आणि मी उठून स्वतःचे अंथरूण घेतले व वरच्या खोलीत जाऊन झोपलो.

मला थकवा आला होता. आजच आमची क्रिकेट मॅच झाली होती. त्यामुळे मी एकदम गाढ झोपेत गेलो आणि एका वेगळ्या विश्वात शिरलो.

मी एका ऑपरेशन थिएटरमध्ये घुसलो. तेथे मला २ काळे कोट व पँट घातलेल्या माणसांनी धरले आणि म्हणाले, "डॉक्टर, पंतप्रधानांना ब्रेन ट्युमर झालाय. तुमच्यावर सर्व प्रजेचे हित अवलंबून आहे. डॉक्टर लवकर ऑपरेशन करा." मी त्यांना म्हटले की मी कोणी डॉक्टर नाही. तरीही जबरदस्तीने त्यांनी हातात ब्लेड दिले. मी नाही नाही म्हणत अजून एका दुसऱ्या विश्वात घुसलो.

तेथे मी एका लग्नमंडपात होतो. परत ती दोन माणसे आली आणि मला उचलून स्टेजवर नेले. जाताना माणसे म्हणत होती, काय भाग्यवान पोरगाय ज्याला असली बायको मिळाली. माझ्या डोक्यात प्रश्नांचे लोट आले. स्टेजवर पोहोचल्यावर बघतो तो काय एक जाड बाई कांदा खात माझ्याकडे बघत होती. तेव्हा माझ्या लक्षात आले की मी माझ्या लग्नात आहे. मी ओरडू लागलो मला लग्न नाही करायचे. तर ती काळा कोट घातलेली माणसे म्हणाली,



"आमच्या बहिणीबरोबर लग्न कर नाहीतर आमच्याशी गाठ आहे काय?" मी उठलो आणि पळत मंडपातून बाहेर गेलो.

पुढे पाहतोय तो काय? जगातील सर्वात मोठ्या कोर्टाच्या दारात मी उभा होतो. आजूबाजूला कोणीही नव्हते. मी इकडे तिकडे बघितले. सर्वत्र सुन्न होते. एकदम पायांचा आवाज येऊ लागला टप-टप. मागे वळून पाहिले तर ती दोन माणसे येत होती. ती ओरडत होती, "चला डॉक्टर पंतप्रधानांना वाचवा, आमच्या बहिणीशी लग्न करा. चला." मी जोरात कोर्टाचा दरवाजा वाजवू लागलो. एकदम दरवाजा उघडला आणि पोलिसांनी पकडून मला अपराध्याच्या कठड्यात उभे केले. जज्ज साहेब म्हणाले, "तुझ्यावर तीन गुन्ह्यांचा आरोप आहे. तो या दोन पोलिसांनी दाखल केलाय." ते पोलिस म्हणजे त्याच दोन व्यक्ती होत्या. मी म्हणालो, "कसले गुन्हे?" त्यातला पहिला म्हणालो, "तू एका मुलीशी लग्न केले नाही, तिला मंडपात तसेच सोडले." दुसरा म्हणाला, "तू प्रजेचा विश्वासघात केला आणि पंतप्रधान मेले आणि तिसरा म्हणजे तू तुझ्या आईचे ऐकले नाही आणि वरच्या खोलीत आलास. तुला जगातील सर्वात मोठी शिक्षा होतेय." हे ऐकल्याबरोबर मी थरथरू लागलो. ते दोन पोलिस आले व त्यांनी मला धरायला आणि मी पळायला एकच वेळ. मी एकदम जागा होऊन खाली पळत आलो. खाली आई मला शोधत होती. तिला मी एकदम बिलगलो आणि म्हणालो, "आइ ऽ s s s सॉरी!".

❑

---

## आणि परीक्षा दिली पान ३ वरून

मग एका मगातच खाटेवर आंघोळ केली. माझी भूक घशामुळे मोसंबीच्या पेलाभर रसावर भागवावी लागायची. भेटणाऱ्यांची गर्दी वाढू लागली. सर्वांनी एकच सल्ला दिला, काळजी करू नकोस. ठीक होईल. रात्री डास आम्हाला फोडून काढत होते. आता सलाईन काढली होती. माझे मनही घरच्या दिशेने उचल खात होते. वेळ घालवण्यासाठी वर्तमानपत्रांचा माझ्याकडून फडशा पडू लागला. मामा आला. सकाळी थालपिठांचा नाष्टा व्हायचा (घसा बरा झाल्यावर). माझ्यात सुधारणा होऊ लागली पण मनावरचा तणाव कमी झाला नव्हता. पेपर होतेच. आता गाण्यांचा फड रंगू लागला. आठवणी निघू लागल्या. आमची सुटका झाली. घरी आलो. माझी ईश्वराकडे एकच प्रार्थना आहे की सर्व गुण देगा देवा! आजारपण नको देवा.


❑

# म्हव

कमलेश गुंजवटे

इयत्ता ४ थी

एकदा सुट्टीच्या दिवशी दुपारी खेळता खेळता गव्या आला आणि म्हणाला, "तुम्हाला माहिती आहे का? त्या आमच्या रानात हिरीपाशी लिंबावर म्होळ हाय म्हणं.



जावूया का फुडच्या रविवारी काढायला? पण, आदीगर बगून तर यूवकी." असं म्हणलं की हातातला खेळ टाकून आम्ही सगळे ते मधमाश्यांचे पोळे नीट बघण्यासाठी गेलो. म्हणजे माश्या केवढ्या आहेत. मधाचा कांदा केवढा आहे, झाड कसं आहे हे बघून कसं कसं कोणी कोणी काय काय करायचं हे ठरलं. त्या पोळ्यात किती मध मिळेल या विचारात पुढचे आठ दिवस गेले. ठरलेल्या दिवशी दुपारीच मी, गव्या, भैया आम्ही तिघेच घराबाहेर पडलो आणि गव्याच्या रानात पोहोचलो. आमच्या म्हव काढण्याच्या कामगिरीला सुरुवात झाली.

दुपारची उन्हाची वेळ असल्याने रानात कुणीच नव्हतं. येतानाच आम्ही फुल शर्ट, फुल पँट घालून आलो. आता बरोबर आणलेले टॉवेल डोक्यावरून तोंडावरून गुंडाळून घेतले. गव्या नारळाची शेंडी आणि काडेपेटी खिशात घेऊन आधी झाडावर चढला. मग मी थोडा वर गेलो आणि भैयाने माझ्या हातात विळा दिला मी वर चढलो. आम्ही दोघे म्हवापाशी पोहोचलो. मग गव्याने नारळाची शेंडी पेटवली आणि म्हवासमोर धरली. धुरामुळे सगळ्या माशा घोंघाऊ लागल्या. दोन घावात मी ढांपी तोडली. ती खाली पडली. भैयाने झेलली आणि तो पळत सुटला . मी झाडावरच होतो. माझ्या बोटांना दोन माश्या चावल्या होत्या,गव्यालाही दोन -तीन माश्या चावल्या. फांदी घेऊन पळताना पोळ्यावर राहिलेली एक माशी भैयालाही चावली. भैया पळत जाऊन रस्त्यावर उभा राहिला. आम्ही दोघे सरसर उतरलो व रस्त्याकडे पळत सुटलो आणि भैयापाशी पोचलो. आम्ही म्हव लपवत-लपवत गव्याच्या घरी पोचलो. घरातील एक ताटली आणून त्यात मधाचा कांदा काढला व तिघांचे तीन वाटे केले आणि मधावर ताव मारला. जिथं माशी चावली होती तिथला काटा काढला व त्यावर मध आणि तुळशीची माती चोळली. असे आम्ही गुपचूप मध खातो.

❑

---

## मला

जमिनीवर राहून सूर्याचे किरण
मुठीत पकडायचंय मला
प्रवाहात राहून
मागे वळायचंय मला
मागे राहिल्यांना
पुढे न्यायचंय मला
तलवार न घेता
जग जिंकायचंय मला
जगाचा सम्राट नव्हे
माणसांतला माणूस
व्हायचंय मला

**पूजा गायकवाड**
**इयत्ता ७ वी**

## ते शब्द हवेत

अथांग काळजाच्या गाभाऱ्यातून उमटणारे
ते शब्द हवेत माझ्या मनाला शोभणारे
ते मी माझ्या काळजात ठेवेन
सतत ते शब्द म्हणेन
कोणाला सांगणारही नाही
ते शब्द कधी विसरणारही नाही
ते शब्द हवेत असे
दुसऱ्यांना आवडणारे
सतत त्यांचे कौतुक करावे असे
ते शब्दच आहेत तसे

**अदित्य पाटणकर**
**इयत्ता ८ वी**

# पाडा

मनेष लहांगे

इयत्ता ८ वी

पाच-सहा घरे मिळून पाडा तयार होतो. बारा पाडे मिळून गाव तयार होतो. तसाच एक ऐना गाव आहे. हा गाव जंगलाच्या मधोमध वसलेला आहे. गावाच्या जवळ उंच शिखर उभारलेले आहे. खालून बघितलं तर विष्णूचे मुकूटच आहे असा भास होतो. या गावामध्ये लोकांचे जीवन अगदी हलाकीचे आहे. इथल्या लोकांच्या जाती कातकरी,वारली,मल्हार कोळी इत्यादी आहेत. या जातींमध्ये गट पडल्यामुळे इथले लोक जातीभेद करतात. तू त्या जातीचा आहे. तुला पाणी कशाला द्यायचं, आमच्या पाड्यात कशासाठी आला, अशाप्रकारे लोकं एकमेकांमध्ये जातीभेद करतात. या सर्वच कारणांमुळे एकमेकांना कुऱ्हाडीने मारून डोळ्यामध्ये तिखट घालून हा दर वर्षीचा पराक्रम सुरू राहतो. इथल्या लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती हा आहे. त्याचबरोबर मासेमारी आणि जंगलातील लाकडे तोडून वीस किलोमीटर अंतरावर चालून कोळ्यांना लाकडे विकायची आणि दिवसभरात उपाशी राहायचं अशा प्रकारे इथल्या लोकांचे जीवन आहे. त्याच बरोबर इथल्या लोकांना शेतीच्या संदर्भात खूप तोंड द्यावे लागते. वारंवार ओल्या दुष्काळामुळे शेतीतील पिकाचे नुकसान होते. या सर्वच गोष्टींबरोबर इथल्या लोकांचा अंधश्रध्देवर खूप विश्वास आहे. एखाद्या वेळी पाड्यावरती जर कुणी मेलं असेल तर जेवण नाही खायचं, घरातलं पाणी नाही प्यायचं आणि दुसऱ्या पाड्यात जाऊन पाणी प्यायचं, जेवण खायचं असं लोक सांगतात. एखाद्या वेळी कोणाला साप चावला असेल तर त्याला बाजूचे लोक भीती दाखवणार आणि गावातल्या तांत्रिकाकडे नेणार. तेव्हा तांत्रिक सुपामध्ये तांदूळ घेतो आणि हनुमान, शंकर, राम, लक्ष्मण यासारखी नावं मोठमोठ्याने घ्यायला लागतो. हातामध्ये तांदूळ घेऊन साप चावलेल्या माणसाला जोरजोराने अंगावरती मारतो. जर त्या माणसाला बिनविषारी साप चावला असेल तर त्या माणसाला काही नाही होणार. तो माणूस चांगला फिरेल तेव्हा सर्व लोकांना वाटणार की या तांत्रिकाने चांगला केला. तेव्हा तांत्रिक त्यांच्या जवळ कोंबडी, दारू इत्यादी गोष्टी मागतात. लोक कष्टाचे काम करून ते सर्व तांत्रिकाला देतात. अशा प्रकारे गरीब लोकांना तांत्रिक लुबाडतात.

जर विषारी साप चावला तर त्या माणसाच्या पूर्ण शरीरात विष पसरतं. काही उपचार केले नाहीत तर त्या माणसाला जग सोडून जावे लागते. तेव्हा तांत्रिक म्हणतो की तुम्ही त्याला वेळेवर आणलं नाहीत. म्हणून तो मरण पावला. अशा प्रकारे तांत्रिक पूर्ण गावातील लोकांना लुबाडतो. त्याच्यामुळे कधीही अंधश्रध्देवरती विश्वास ठेवू नका. आता पाड्या-पाड्यांवरती दवाखाने सरकारने बांधून दिले आहेत. त्याच्यामुळे लोक तांत्रिकाकडे जात नाहीत. वेळच्या वेळी दवाखान्यात येतात आणि ऐना हे गाव आता सुखाने राहू लागलं आहे. कधीही अंधश्रध्देवर विस्वास ठेवू नका ही माझी तुमच्यावरती अट आहे.

❑



# आमचा भैय्या

सुजित क्षीरसागर
इयत्ता ६ वी


मी, आई आणि भैय्या संध्याकाळच्या वेळी असेच निवांतपणे बसलो होतो. गप्पा रंगात आलेल्या आणि का कुणास ठाऊक आई अचानक स्तब्ध झाली. मी पाहिले तर ती भैय्याकडे एकटक पहात होती. तिचे डोळे पाणावल्याचेही मला जाणवले. आई अचानक भावविवश का झाली समजेना. मी तिला विचारू लागलो. मात्र काहीच न बोलता ती माझ्याकडे व भैय्याकडे पहायची. शेवट मी तिच्या गळी हात घालून तिला बोलते करण्याचा प्रयत्न करू लागलो. तेव्हा तिने 'तो' प्रसंग सांगितला.

भैय्या साधारणतः दोन वर्षांचा होता आणि माझा तर जन्मही नव्हता. तेव्हा माझी आई, पप्पा भाडोत्री घरात रहात होते. तेथे इतरही भाडेकरू रहात होते. त्यापैकी एका भाडेकरूच्या नातेवाईकाचे सांगलीला लग्न होते आणि साहजिकच त्याने या सर्वांना लग्नाचे आग्रहाचे निमंत्रण दिले होते. सर्वजण जाण्यासाठी तयार होते मात्र आई जाण्यास नकार देत होती कारण भैय्या लहान होता. प्रवासाची दगदग होणार होती आणि मुख्य म्हणजे आईला प्रवास बिलकुल सहन होत नसे. तरीही सर्वांच्या आग्रहाखातर आई त्या लग्नाला जाण्यास तयार झाली. खाजगी भाडोत्री वाहन करून सर्वजण निघाले आणि आईला उलट्यांचा त्रास सुरू झाला. हे सर्व सहन करीत कशीबशी सर्वजण सांगलीला पोहोचली. अर्धाअधिक दिवस लग्नाच्या ठिकाणी गेला. आईला विश्रांती हवी होती. मात्र ती मिळणे दुरापास्तच होते.

संध्याकाळी सर्वजण परतीच्या मार्गाने निघाले. गाडीत बसल्याबरोबर आईने डोळे झाकले. भैय्या पप्पांकडे असायचा आणि आताही तो पप्पांजवळच होता. सर्वजण प्रवासी थकले होते. कोणीच काहीच बोलत नव्हते. अनेकांचे डोळे झाकले जात होते. गाडी सुरू होती. मायणीमध्ये गाडी आल्यावर कोणीतरी चहा पिण्याची कल्पना काढली आणि सर्वजण एक छोटे चहाचे हॉटेल पाहून उतरले. पप्पांनी आग्रह करून आईला चहा घेण्यास सांगितले. सर्वजण चहा घेत होते. चहाचा कार्यक्रम आटोपल्यानंतर सर्वजण गाडीत बसले आणि लगेच गाडी सुरू झाली, सुसाट वेगाने धावू लागली. मात्र का कुणास ठाऊक आईचे खाडकन डोळे उघडले. पप्पा व इतर पुरूष मंडळी पुढील बाजूस

बसली होती. तेव्हा आईने त्यांच्याकडे पाहिले पण भैय्या तिथे नव्हता आणि आईच्या काळजात धस्स झाले. तिने मोठ्यांदा ओरडून विचारले, "सुमित कुठाय?" आणि सर्वांना परिस्थितीचे गांभीर्य समजले. गाडी गचकन जागेवर थांबली. आई गाडीतून उतरुन उलट दिशेने धावू लागली. बाकीही सारे उतरले. समोर रस्त्यावर पाहिले तर दूरवर एक छोटीशी आकृती धावत-धावत येत होती. होय, तोच तो दोन वर्षे वय असणारा माझा भैय्या होता. गाडी थांबली. क्षणाचाही विलंब न घालवता आई वाऱ्याच्या वेगाने तिकडे धावत निघाली. तिने त्याला उचलून घेतले. तिच्या अश्रूंना खळ नव्हता. भैय्या मात्र निर्विकार चेहऱ्याने सर्वांकडे पहात होता. आईच्या मनात अनेक विचारांनी थैमान घातले होते. जर एखादे वाहन भरधाव गतीने आले असते तर? जर कदाचित तो दुसऱ्या रस्त्याने वळला असता तर? तिला काही सुचत नव्हते आणि ती स्वतःला दोष देत होती. आईने हे सर्व सांगितल्यानंतर माझेही डोळे पाण्याने भरले होते आणि भैय्या मात्र माझ्याकडे व आईकडे पाहून मिस्कील चेहऱ्याने गालात हसत होता.

❑



# गोड साखर

**दीपिका जाधव**

**इयत्ता ८ वी**

फलटणमध्ये राहत असून गावातील साखर कारखाना मी पाहिला नव्हता याची मला खंत वाटत होती. म्हणून एक दिवस संधी साधून मी माझ्या बाबांबरोबर कारखाना पहायला निघाले. कॅनॉलच्या बाजूने जाताना त्यातल्या संथ वाहणाऱ्या पाण्याकडे पाहून मन आनंदत होते. इकडे-तिकडे बघत मी चालले होते. रस्त्यावरून अनेक माणसांची ये-जा चालू होती. अनेक बैलगाड्यांमधून ऊस कारखान्यात चालला होता आणि आता कारखाना जवळ आला असे वाटू लागले.

आम्ही रस्त्याने चालल्लो असतानाच अचानक समोर असलेला जमाव पाहून आम्ही थबकलो. काय चालले आहे काही समजत नव्हते. गर्दीतून आम्ही थोडे पुढे आलो आणि समोरचे दृष्य पाहून मन अगदी पिळवटून निघाले. उसाच्या ओझ्याने एक थकलेला बैल खाली कोसळला होता. त्याला उठवून पुन्हा ओझ्याला जुंपण्यासाठी त्याच्या मालकाची धडपड चालली होती. पण तो बैल इतका थकला होता की पुन्हा उठून ओझे उचलण्याची त्याच्यात ताकद नव्हती.



त्याचा मालक वेताच्या काठीने त्याला जोरात फटके मारत होता. त्या बैलाच्या डोळ्यातून पाणी पडत होते. त्याच्या शेजारच्या बैलाला सुध्दा त्याची दया येत होती पण त्या मालकाला त्याचे काहीच वाटत नव्हते.

बाजूला लोकांच्या कुजबुजण्याचा आवाज येत होता. त्यातील एका म्हाताऱ्या माणसाचे बोलणे माझ्या कानावर पडले. तो म्हणत होता की, "म्हाताऱ्याचे जीवन असेच असते. या बैलाचे सुध्दा अगदी माझ्यासारखेच आहे. म्हातारपणामुळे काम होत नाही पण मालकाच्या अट्टाहासापुढे त्याचेही काही चालेना. खातोय मार बिचारा." त्याचे हे बोलणे ऐकून मला फार वाईट वाटले आणि समजले की माणसाची दशा सुध्दा एखाद्या जनावराप्रमाणेच आहे.

तो बैल चाबकाचे फटके खात होता. ते पाहून मलाच वेदना होत होत्या. शेवटी गाडीवानाने त्या बैलाची शेपटी तोंडात धरून जोरात चावली. ते दृश्य पाहून माझ्या डोळ्यातून पाणी आले. पण मी काहीच करू शकले नाही. नुसती बघत राहिले. हे दृष्य पाहून दगडालाही पाझर फुटला असता.

बैल धडपडत उठला व आपल्या नशिबाचा भार पाठीवर उचलून एक-एक पाऊल कष्टाने टाकीत चालू लागला. आज मी असा एक बैल पाहिला पण रोज असे कितीतरी बैल पडत असतीलच आणि त्यांना मालकाचे जुलूम सहन करावे लागत असतील.

कारखान्यात तयार होणाऱ्या या मधुर साखरेमागे या बैलांची आर्त हाक असते. पण ती कोणालाच ऐकू येत नाही आणि त्यांच्या पाठीवरचे ओझे कधीच कमी होत नाही. त्यांच्या या ओझे उचलणाऱ्या पाठीवरून कोणीच प्रेमाने हात फिरवत नाही. मात्र फटके मारणारे खूप लोक असतात. त्यांना हे जीवन नको वाटत असेल पण तरीही ते नाईलाजाने जगतच असतात. अगदी एकटे, असहायपणे, कोणाच्याही आधाराशिवाय.

❑

---

**सहलीतील सातारा पान १० वरुन**

मग सर्वजण कास तलावाच्या दिशेने जाऊ लागलो. कास तलाव निळाशार दिसत होता. मग किनाऱ्यालगत आम्ही तलावाच्या पाण्यात उड्या मारल्या व पाण्याचा आनंद लुटला. आता सर्वांच्या पोटात कावळे ओरडू लागले. मग सर्वांनी जेवण काढले. लोणचे, भाजी, चपाती खात असताना त्याचा तिखटपणा सर्वांच्या चेहऱ्यावर झळकत होता. जेवण झाल्यानंतर आम्ही तिथल्या झाडाच्या शीतल छायेत आराम केला.

आता जायची वेळ झाली होती म्हणून आम्ही गाडीत बसलो व साताऱ्याला टाटा-बाटा करून फलटणला यायला निघालो. अशी ही सहल फार रंगतदार झाली व सर्वांना निसर्गाचा आस्वाद घेण्याची संधी मिळाली.

❑

# आम्ही हरलो आम्ही जिंकलो

**अजिंक्य सोनवणे, सुमित क्षीरसागर**
**इयत्ता ८ वी**



२००६ -२००७ या वर्षी आमचा १४ वर्षाखालील संघ अंतिम सामन्यात अवघ्या दोन गुणांसाठी पराजित झाला. ताथवडा आश्रमशाळा या संघाविरुद्ध आम्हाला हा पराभव पत्करावा लागला तेव्हा आम्हाला खूप दुःख झाले. मुलांचे निराश चेहरे पाहून सरांनी मुलांना आत्मविश्वास दिला की तुम्ही पुढील वर्षी नक्की विजयी व्हाल. आपण त्यासाठी कसून सराव करू. आमचा संघ शाळेत आला. प्रथमच चौदा वर्षांखालील संघ सामन्यात उतरला व अंतिम सामन्यात दोन गुणांसाठी पराजित झाला. अशी ही आमची कामगिरी पाहून आम्हाला सर्वांच्याकडून खूप शुभेच्छा मिळाल्या. यामुळे आम्हाला जरा बरे वाटले. आमची शाळा सुरू झाली. ठरल्याप्रमाणे सरांनी आमचा संघ सरावासाठी उतरवला. आम्ही सराव मनापासून करत होतो कारण या वर्षी आम्हाला विजय मिळवायचा होता असे आम्ही ठरवले होते.

मालिका सरु होण्यासाठी अवघा एक आठवडा राहिला होता. सर आमचा सराव सकाळी व शाळा सुटल्यावर घेत होते. यावर्षी सामन्यासाठी १७ वर्षांखालील व

१४ वर्षांखालील संघ उतरणार होते. यासाठी सर संघ निवडत होते. शेवटचे दोन दिवस राहिले. माझी (सुमित) कर्णधारपदी निवड झाली. पण वयाची अट अशी होती की सातवीत असणारे पण १९९४ साली जन्मलेले खेळाडू हवेत. अजिंक्य, मनेश, साबीर व मी अवघ्या काही महिन्यांसाठीच वय न बसल्याने संघातून वगळले गेलो. अजिंक्य तर अवघ्या ३ दिवसांसाठीच वयाची अट असल्याने वगळला गेला. त्याचे भाग्यच नव्हते ही मालिका खेळण्याचे. आमच्या चौघांच्या भावना दुखावल्या गेल्या. घरच्यांना सांगितले होते की ही मालिका आम्हीच जिंकणार. पण आमच्या स्वप्नांवर पाणी फेरले गेले. सरांच्या मते आम्ही चौघेही खेळाडू सर्वोत्तम होतो. आमच्या जागी चार नवोदित खेळाडू घेतले गेले व कर्णधारपदी मुईनची निवड झाली. हे सर्व सामने यशवंतराव चव्हाण हायस्कूल या शाळेच्या मैदानावर भरले होते. आमचा प्रथम सामना अलगुडेवाडी या शाळेच्या संघाविरुध्द होता. सर्वांचे डोळे सामन्याकडे लागले होते. प्रतिस्पर्धी संघाने ताज्या दमात सुरुवातीचे महत्त्वाचे गुण टिपले आणि आमच्या नवोदित खेळाडूंवर दबाव आणला. आमच्या खेळाडूंचा आत्मविश्वास कमी होउन हातातील गुण सुद्धू लागले. अखेर जे व्हायचे तेच झाले. आम्ही सामना गमावून बसलो. आमचा संघ पहिल्याच फेरीत गारद झाला व बाहेर पडला तेव्हा कर्णधार मुईनला आपले अश्रू आवरता आले नाहीत. आम्हा चौघांनाही वाईट वाटले. आमच्या वयामुळे हा सामना आमच्यापासून दुरावला गेला असे म्हणण्यास काहीच हरकत नाही.

आम्ही हा सामना गमावला असला तरी सर्वांची मने जिंकली. शेवटपर्यंत लढत राहिलो. इतर संघांसारखे डमी खेळाडू न खेळवता हा सामना खेळलो. नवोदित खेळाडूंना संधी देउन सामना खेळलो. हा सामना आम्ही न चिडता खेळलो व हरलो यातच आमचा विजय होता.

❑

# Our Cricket Match

Saurabh Shinde

8th


On the 24th March Bal Sansad arranged a Cricket match. The match was between eighth standard students and teachers.

On that day teachers won the toss and elected to bat. First the opening batsmen were Bavkar sir and Jagdale sir. Sumeet delivered the first over. The match was of 7 overs. In the teachers' team Sonavalkar sir made many runs.

After 7 over teachers' team's score was 36 and we started to bat. Our opening batsmen were Mueen and Rushikesh. On the second ball Mueen got out. After that wickets fell one by one.

At last we lost by 10 runs but we had a lot of fun in that match.

❑



# A Magical Dream

Sameer Shaikh
8th

One night I was going to bed. I was thinking about writers and books and the characters in them. After some time I fell asleep. I got a dream about my thoughts. There was a room. I went inside. It was the biggest magical room. On the left side of the door there was a forest and on the right side there were mountains. In front of the door was a desert and between them I saw many writers and they were writing their books. I went ahead. There was Mogli playing with his animal friends and infront of them there was Kipling. He was writing the 'Jungle book'. On the right side, in the mountains I saw a plane crash. Near sat P. P. Reid and he was writing seventy days. I saw Aladdin and his Gini. I wondered. I went ahead and saw J.K. Rowling. She was writing Harry Potter's last book. I went on ahead. There I saw Mount Everst and on the top I saw Edmand Hilary and Sherpa Tensing.

Ahead I saw Columbus and found the West Indies. There were many things that made me wonder.

There was a button. I pressed it. And. . . all the characters stopped and became statues. I thought of an idea. I kept Mogli in the place of Alladin and put Alladin in Harry potter's place. Then I put Harry Potter in Mogli's place and pressed the button once more. The statues came alive and I sat there and looked on.

I looked and looked and laughed and lagughed. Harry Potter killed *Sherkhan* with his magic spell. Mogli took Aladdin's *kalin* and put it around his waist. Alladin sent his Gini after the bad wizards.

I had changed the classics. The room was moving on my order. I was very happy. But it wansn't long before my father woke me up and all the happiness and all the characters disappeared from my eyes.

❑

# A Thrilling Moment

Rushikesh Kumbhar

8th

Once I was returning home from school. When I opened the gate suddenly I saw one snake coming towards me and my cat chasing the snake. The snake saw me and turned back. At that time the cat was growling at the snake. The snake was hissing at the cat. The cat raised his paw and my mother came there. I saw that my mother was afraid. I backed away from the gate and allowed the snake to come out. It turned back and went into the shrubs. The cat went looking for it. Then I went inside.

❑



## My sister

Adventurous and fun-loving,

As she is every day

She has her own charm.

One day she came into the world

And created a special place,

Under the blue sky.

She won the hearts of everybody.

She is my best friend and sister,

And member of my family.

**Akshaya Patil**
**Standard 8th**

## Spell of the night

When the sun light goes off,

The moon light comes on.

The cricket makes noise,

And owl catches mice.

Trees sleep, birds sleep

But bats wake up.

The stars are bright,

On a new moon night.

All flowers sleep,

But Ratrani wakes

Then come the sun rays.

And the night spell flays.

**Rashma Sinde, Dipika Jadhav**
**Standard 8th**

# मलपृष्ठ

सह्याद्रीच्या पश्चिम उतारावरचा प्रदेश वारली प्रदेश म्हणून ओळखला जातो. दहा-पंधरा लोक आपल्या शेतजमिनींजवळ झोपड्या बांधून राहतात. याला पाडा म्हणतात. वारली लोकांच्या झोपड्या चौकोनी किंवा आयताकृती असतात. या कोवळ्या बांबूच्या (बुंधीच्या) किवा कारवीच्या काडाच्या बांधतात. शेणमाती कालवून यांच्या भिंती लिंप्रतात.

सामान्यतः विवाहाच्यावेळी किंवा विशिष्ट धार्मिक कार्याच्यावेळी या भिंती शेण, माती, गेरू यांनी सारवून त्यावर चित्रे काढतात. देवतांचे पूजन ही संकल्पना या चित्रांच्या निर्मितीमागे दिसते. धनधान्यांची समृध्दी व्हावी, घरातील रोगराई जावी, भुताखेतांची बाधा टळावी, देवता खूश व्हाव्यात अशी अनेक कारणे या चित्रांमागे असतात. प्रथम एक चौकोन आखून घेण्यात येतो आणि मग त्यात पाण्यात कालवलेल्या तांदळाच्या पिठीच्या रंगाने गवताची काडी किंवा भाताची काडी घेऊन मलपृष्ठावर दाखविलेला चौक काढतात. ही चित्रे चितारणाऱ्या बायकांना धवलेरी म्हणतात. लग्नाच्या आदल्या दिवशी ही चित्रे काढतात. चौकाच्या आतल्या बाजूला घोड्यावर बसलेल्या नवरा-नवरीचे चित्र काढले जाते. याशिवाय सूर्य, चंद्र, लिसान (शिडी), फणी अशी चित्रे चितारतात. या-मागेही काही संकेत आहेत. वारली लोक सूर्य-चंद्राला देव मानतात आणि त्यांची सकाळ-संध्याकाळ पूजा करतात. त्यामुळे चौकात चंद्र-सूर्याचे चित्र काढले जाते. चौकाच्या वरच्या बाजूला कळशीमध्ये नारळ ठेवलेला असतो. त्याच्याबरोबर आंब्याची पाने ठेवलेली असतात. त्याला 'करा' असे म्हणतात. तो 'करा' लग्नाच्या वेळी लागतो. त्यामुळे कऱ्याचे चित्र रेखाटले जाते. नवरा नवरीला हुंडा म्हणून ज्या वस्तू देतो त्यात फणीही असते. फणीचा उपयोग पूर्ण आयुष्यभर होतो म्हणून फणीचे चित्र काढतात. हुंड्यात दिलेल्या लिसानाचा उपयोग लग्नानंतर नवऱ्याचे बाशिंग दारावर टांगण्यासाठी होतो. म्हणून लिसानाचे चित्र रेखाटले जाते.

वारली चित्रकला ही मुख्यतः बारीक निरीक्षण व जीवनानुभवातून प्रकट झालेली दिसते. यात मुख्यतः पूजा-अर्चा, नृत्ये, दैनंदिन कामे व आजूबाजूचा निसर्ग यांचे प्रतिबिंब दिसते. हा कला-प्रकार त्यांच्या जीवनाचाच एक भाग आहे याची प्रचिती आपल्याला घरोघरी येते. पारंपरिक रूढी संकेत या चित्रांमध्ये आपल्याला दिसतो.

